# जीएम पिकांमुळे शेतकऱ्यांना फायदाच होईल : डॉ. तुकाराम मोरे

**पुणे:** शाश्वत शेतीसाठी जैव तंत्रज्ञानाचा स्वीकार केलाच पाहिजे. त्यामध्ये काही दोष असतील तर ते दूर करू परंतु कुठल्याही तंत्रज्ञानाला दोष देऊ नका असे आवाहन करत जीएम किंवा जनुकीय बदल पिकांमुळे शेतकऱ्यांना अच्छे दिन येतील असे मत महात्मा फुले कृषी विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. तुकाराम मोरे यांनी व्यक्त केले.

वनराई संस्थेतर्फे शनिवारी इंडियन मेडिकल असोसिएशन हॉल, टिळक रोड येथे संगम – २०१५ ही राष्ट्रीय पातळीवरील शेतकरी नेत्यांची एकदिवसीय परिषद आयोजित करण्यात आली होती. त्याच्या समारोपप्रसंगी डॉ. मोरे बोलत होते. कॉन्फेडरेशन ऑफ हॉर्टिकल्चर ऑफ असोसिएशन ऑफ इंडियाचे अध्यक्ष एच. पी. सिंग, महाराष्ट्र राज्य शिक्षण व संशोधन परिषदेचे उपाध्यक्ष डॉ. राम खर्चे, कोकण कृषी विद्यापीठाचे माजी कुलगुरू डॉ. शंकरराव मगर, जिल्हा कृषी अधिकारी सुभाष काटकर, वनराईचे अध्यक्ष रवींद्र धारिया हे यावेळी उपस्थित होते.

डॉ. मोरे म्हणाले, महात्मा फुले कृषी विद्यापीठात जीएम पिकांच्या सर्व चाचण्या नियम व अटी पाळून यशस्वीरीत्या पूर्ण झाल्या आहेत. मात्र, अजूनही त्याच्याबाबत निर्णय झालेला नाही. संसदेची मान्यता मिळाल्यानंतर त्याचा विचार करू असे सांगितले जात आहे. मात्र तोपर्यंत उशीर झाला असेल. बीटी कॉटनलाही असाच विरोध झाला होता मात्र, नंतर बीटी कॉटन हे फायदेशीर असल्याचे सिध्द झाले आहे. दिवसभर झालेल्या चर्चासत्रांचा संदर्भ देत डॉ. मोरे म्हणाले, शेती ही फायदेशीर झाली पाहिजे याबाबत सर्वांचेच एकमत आहे. परंतु पश्चिम भारतातील महाराष्ट्र, गुजराथ, मध्य प्रदेश व राजस्थान येथील भौगोलिक स्थिती वेगळी आहे. या सर्व गोष्टींचा विचार करून व चिंतन करून सर्वांचा एक दिशादर्शक मसुदा तयार केला जावा अशी अपेक्षा त्यांनी व्यक्त केली.